Publication: Navshakti

Date: Friday, June 28, 2013

Edition: Mumbai

# 'इंडिकॅश' भारतातील पहिले व्हाईट लेबल एटीएम नेटवर्क सुरू

**प्रतिनिधी**

मुंबई, दि. २७ - टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेडच्या संपूर्ण मालकीची उपकंपनी टाटा कम्युनिकेशन्स पेमेंट सोल्युशन्स लिमिटेडने (टीसीपीएसएल) 'इंडिकॅश' हे व्हाईट लेबल एटीएम्स अर्थात ऑटोमेटेड् टेलर मशिन्सचे भारतातील पहिले नेटवर्क आजपासून सुरु केले. संपूर्ण देशभरात एटीएम सुविधेचा प्रसार व्हावा या भारतीय रिझर्व बँकेच्या धोरणानुसार टीसीपीएसएलने हे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील वसईजवळील चंद्रपाडा या गावात आज पहिल्या इंडिकॅश एटीएमचे उद्घाटन करण्यात आले. याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

याप्रसंगी भारतीय रिझर्व बँकेचे एक वरिष्ठ अधिकारी, टाटा कम्युनिकेशन्सचे मॅनेजिंग डायरेक्टर व सीईओ विनोद कुमार आणि टाटा कम्युनिकेशन्स पेमेंट सोल्युशन्स लिमिटेडचे सीईओ संजीव पटेल उपस्थित होते.

इंडिकॅश (इंडिया व कॅश) हा भारताच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. देशातील छोटी व मोठी शहरे, गावांमध्ये एटीएम सुविधा उपलब्ध होण्याचे आधुनिक युग या निमित्ताने सुरु होत आहे. तब्बल १००.०९ बिलियन डॉलर्सची आर्थिक उलाढाल असलेल्या टाटा ब्रॅन्डने सुरु केलेले भारतातील पहिले व्हाईट लेबल एटीएम्सचे नेटवर्क हे कोट्यावधी भारतीयांना त्यांचे स्वत:चे पैसे स्वत:च्या सोयीनुसार वापरता यावेत या उद्देशाने तयार करण्यात आले

**टाटा कम्युनिकेशन्स पेमेंट सोल्युशन्स लिमिटेडचा उपक्रम**

**तीन वर्षात १५,००० नवीन व्हाईट लेबल एटीएम सुरु करणार**

आहे.

यावेळी टाटा कम्युनिकेशन्सचे चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर श्रीनिवास अद्देपल्ली यांनी सांगितले की, इंडिकॅशच्या बाबतीतही टाटा समूहाने हीच परंपरा कायम राखली आहे. जागतिक पातळीवर विचार करता भारतात एटीएम सुविधेचा प्रसार खूपच कमी प्रमाणात झाल्याचे आढळून येते. एक मिलियन लोकसंख्येमागे आपल्या देशामध्ये केवळ ९८ एटीएम आहेत, युएसमध्ये हेच प्रमाण १३९०, युकेमध्ये ५३० व चीनमध्ये २११ इतके जास्त आहे.

टाटा कम्युनिकेशन्स पेमेंट सोल्युशन्स लिमिटेडचे सीईओ संजीव पटेल यांनी सांगितले की, भारतातील पहिले व्हाईट लेबल एटीएम नेटवर्क सुरु करण्याची संधी भारतीय रिझर्व बँकेने आम्हाला दिली ही आमच्यासाठी अभिमानास्पद बाब आहे.

इंडिकॅश मशिन्स या डिप मशिन्स आहेत ज्यामध्ये कार्ड आतमध्ये शिरू शकत नाही, यांचा इंटरफेस वापरण्यास अतिशय सोपा असून शहरी व ग्रामीण दोन्ही भागांच्या दृष्टीने यामध्ये बहुभाषिक संदेशांची सोय करण्यात आली आहे. प्रायव्हसी स्क्रीन फिल्टर्स, की पॅड शील्डस् व इलेक्ट्रॉनिक सर्व्हेलन्स या उपाययोजना करुन या मशिन्सवरील सर्व व्यवहार सुरक्षित पद्धतीने होतील याची पुरेपूर काळजी घेण्यात आली आहे.

इतर अनेक बँकांच्या एटीएम्सप्रमाणे इंडिकॅशमध्येही अनेक कॅश व नॉन-कॅश सुविधा उपलब्ध आहेत, जसे, रोख रक्कम काढणे, खात्यातील शिल्लक जाणून घेणे, मिनि-स्टेटमेंट, पिन क्रमांक बदलणे इत्यादी. यामध्ये सर्व स्वदेशी डेबिट कार्डस् स्विकारली जातात, भारतीय रिझर्व बँकेने इतर बँकांच्या एटीएम्सच्या वापरासाठी आखून दिलेल्या नियमांप्रमाणे दर महिन्याची पहिली पाच ट्रान्झॅक्शन्स यामध्ये मोफत करता येतात.

पुढच्या तीन वर्षात टीसीपीएसएल तब्बल १५,००० इंडिकॅश एटीएम कार्यान्वित करणार आहे. त्यापैकी ६७ टक्के एटीएम निमशहरी व ग्रामीण भागात असतील तर उरलेली ३३ टक्के एटीएम मेट्रो व शहरी भागात असतील. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात इंडिकॅश एटीएम वापरणाऱ्या ग्राहकांना इतर मूल्यवर्धित सेवा उपलब्ध करवून दिल्या जातील, ऑफर्स व थर्ड पार्टी प्रमोशन्सदेखील सुरु केली जातील.

तत्पूर्वी, आज सकाळी वसईजवळील चंद्रपाडा या पाचव्या स्तरातील गावामध्ये टीसीपीएसएलने भारतातील पहिले व्हाईट लेबल नेटवर्क - इंडिकॅशचा शुभारंभ केला.

A Joint Venture of Bank of Baroda, Legal & General, Andhra Bank